ख्रिस्त विरोधी आणि त्याचे खोटे प्रेषित म्हणतात की आपण ईश्वर सेवेशी संबंधित कोणतेही कार्य अत्यंत आवडीने करू नये. त्यांचे म्हणणे हे की ईश्वराची आज्ञा पाळणे, प्रवचन देणे आणि ईश्वराच्या शब्दांचे आवडीने पालन करणे पाप आहे. पण ख्रिस्ताच्या रिविलेशन पुस्तकामध्ये, येशूने आपल्याला नेहमी उत्साही रहाण्याची आज्ञा दिली आहे अन्यथा तो आपल्याला त्याच्या मुखातून थुंकून बाहेर फेकेल. (प्रकटीकरण(३ :१६). उत्साह आणि धीटपणा (तीव्र आवड) हे ईश्वर व त्यावर अभिषेक करणाऱ्यांचे दोन नियम आहेत. आपण ईश्वरासाठी जे कोणतेही कार्य करू ते पूर्ण मनापासून, आवडीने व उत्साहाने, करण्याची आज्ञा ईश्वराने दिली आहे (कलस्सैकरांस ३:२३) (मत्तय२२ :३७ ) आणि जर लोकांना ईश्वराच्या शब्दांचा (किंवा त्यापैकी कोणत्याही एका शब्दाचा) राग येत असेल तर ते (जंगली श्वापदांप्रमाणे) क्रूर आहेत असे ईश्वर सांगतो. आणि ईश्वर असेही सांगतो की त्याच्या शब्दांचा राग येणे किंवा त्याचे शब्द झिडकारणे म्हणजे पाप आहे.[४०] ईश्वराचे शब्द नाकारणे म्हणजे येशू ख्रिस्ताला नाकारणे आणि फक्त ईश्वराच्या वचनांचे पालन केल्यानेच (विश्वास ठेवल्यानेच) आपला बचाव होऊ शकतो. **"येशू ख्रिस्तावर [ईश्वराचा शब्द] विश्वास ठेवा आणि तसे केल्यास तुमचा बचाव होईल" (प्रेषितांची कृत्ये १६ :३१).**

व्हॅटिकनने माफियांच्या मार्फत पहिल्यांदा अश्लिल साहित्य, वेश्यावृत्ती, अंमली पदार्थ, दारू लिकर यांचे उत्पादन व विक्री या सारख्या गोष्टींना चालना देऊन या देशातील नैतिकता नष्ट केली आणि आता धर्मपरायणतेच्या खोटया कृत्यांच्या नावाखाली, या बाबींवर निर्बंध आणून व्हॅटिकन, आपली स्वतःची या देशांत व जगभर निर्माण केलेली आणि आपली वाईट कृत्ये झाकू पहात आहे.

आपण अतिशय चांगले, शुध्द, सभ्य व धर्मपरायण आहोत हे भासवण्याचा हा या सैतानी चर्चचा, फसवा कावेबाज मार्ग आहे. त्याचप्रमाणे जगभरावर सेंसॉरशिप करण्याचा हा त्यांचा पहिला प्रयत्न आहे.[४१] या सेंसॉरशिपचा दुसरा उद्देश म्हणजे तिला ज्या पध्दतीने बायबलची शिकवण द्यायची आहे- जी बायबलच्या पूर्णत: विरूद्ध आहे- त्याचा अपवाद वगळता बायबल सहित सर्व भाषण नियंत्रित करणे.[४२] तिला माहित आहे की या जगाला तिच्या सैतानी मार्गाने काम करण्याच्या पद्धतींची कल्पना नाही आणि हे जग - ज्याला याची कल्पना नाही की हा सर्व बीभत्सपणा व कांड तिनेच निर्माण केले आहे - तिची प्रशंसा करेल आणि या पूर्वनियोजित "उदात्त" कृत्यासाठी तिची पूजा करेल. तिच्याबाबत व ती अवलंब करत असलेल्या मार्गाबाबत अज्ञानी असलेल्या प्रत्येकाला भुरळ पाडून ईश्वरापासून दूर नेण्यासाठी व स्वत:कडे आकर्षित करण्यासाठी हे केले जाईल.

या आंधळया लोकांसाठी तिची भविष्यातील योजना म्हणजे नर्क. दु:ख नेहमी कुणाची तरी साथसंगत शोधते आणि सैतान व त्याच्या अनुयायांची स्वत: एकटेच जळून खाक होण्याची इच्छा नाही. त्या नरकातल्या यातना त्यांच्यासंगे अनंत काळ भोगण्यासाठी त्यांना तुम्ही हवे आहात.[४३] तुम्हालाही तेच हवे आहे का जे त्यांना तुमच्यासाठी घडायला हवे आहे? का येशूने तुमच्यासाठी जे बनवले आहे ते म्हणजे - सर्व वाईट गोष्टी, फसवणूक आणि कोणत्याही प्रकारच्या दुखापतीपासून दुरावा आणि त्याच्यासोबत चिरंतन टिकणारा आनंद हे तुम्हाला हवे आहे?[४४]

## योग्य मार्गाने ईश्वराबरोबर रहा

या क्षणभंगुर जीवनासाठी, जे अतिशय छोटे आहे, जगू नका.[४५] विश्वाच्या निर्मात्याने व राज्यकर्त्याने तुमच्यासाठी जी योजना बनवली आहे ती जाणून घेवून तुमच्या चिरंतन भविष्यकाळाचे नियोजन करा आणि या सैतानी पंथाने, या जगावर सैतानाने व रोमन कॅथलिक पंथाने राज्य करण्याची जी अर्थहीन व संकुचित योजना आखली आहे तिचा स्वीकार करू नका.[४६] जर तुम्ही असे केले नाही तर तुम्हीदेखील - जो स्वत:ला या भुतलावरील ईश्वराचा धर्मोदेशक, "ईश्वर" म्हणवून घेतो त्या सैतानाइतकेच - सैतानी वृत्तीचे व उर्मट असल्याचे समजून येईल. फार उशीर होण्याआधी - ताबडतोब ईश्वराबरोबर योग्य मार्गाने जोडले जा. (जसा सैतानाला फार उशीर झालेला आहे). नरकांतून त्याचा येणारा धूर नेहमीकरिता वर येत राहील. (प्रकटीकरण १४.११ ).

> "ईश्वर म्हणतो, या आपण एकत्र येवून बुद्धीवाद करू. जर तुमची पापे रक्तरंजित असतील तर ती हिमासारखी धवल होऊन जातील आणि तुम्ही जरी अतिरक्तरंजित पापे केली असतील तरी ती लोकरीसारखी शुभ्र होऊन जातील, येशूच्या रक्ताच्या माध्यमातून. (यशया१:१८ ).

ईश्वराने आपल्यावरील प्रेमामुळे, त्याचे ज्यावर अत्याधिक प्रेम होते त्याला (त्याच्या पुत्राला) आपल्याकरिता मरण्यासाठी पाठवले. येशूचे आपल्यावर इतके प्रेम होते की त्याने, आपली पापे धुतली जावीत व आपल्याला माफ केली जावीत यासाठी स्वत:चे रक्त सांडून प्राण अर्पण केले व स्वत:चे रक्त सांडले.[४७] आपण जर, ईश्वर आपल्यावर करत असणाऱ्या प्रेमाइतके, ईश्वरावर व त्याचा पुत्र येशुवर प्रेम करत असू, तर आपण आपली पापे व जीवन जगण्याचा आधीचा दुष्ट मार्ग सोडून देवू, ईश्वराचा शब्द अचूकपणे शिकू आणि त्याची सत्ये या जगाला- ज्याला आतापर्यंत खोटे सांगण्यात आले होते – सांगु. असे केल्यास त्यांना ईश्वराने व त्याच्या पुत्राने जे एवढ्या मोकळेपणाने दिलेले जीवन आनंदाने जगता येईल. पण त्यांना एखाद्या प्रवचनकाराशिवाय कसे माहीत होईल? (एखाद्या नवशिक्या प्रवचनकार नव्हे तर ज्याने ईश्वराच्या सर्व मार्गांचा अभ्यास केला आहे अशा प्रवचनकार)?[४८]

> **"पण तुम्ही जर नकार दिला आणि बंड पुकारले, तर तलवार तुम्हाला खाऊन टाकील; कारण परमेश्वराच्या तोंडचे हे वचन आहे." (यशया१:२०).**

---

**३८** मॅथ्यू ४ :३ -११ , १६ :२१ -२३ , रेव्ह. २२ :१८ -१९ **३९** एफ. ४ :२७ , ६ :१७ , II थेस. २ :१४ -१५ , II टिम. १ :१३ , टायटस ३ :१० , हिब्रू. ४ :१२ , जास. ४ :७ **४०** इझेक. २० :२१ -२४ , झेक. ७ :११ -१३ , जास. २ :१० -११ , I जॉन ३ :४ **४१** चर्च अँड स्टेट, भाग. ३७ , नं. १ , जॅन. १९८४ , पृ. १६ **४२** द व्हॅटिकन एंपायर, निनो लाबेलो, पृ. ६८ **४३** मॅथ्यू. २२ :१३ , २५ :३० -४६ , मार्क ९ :४३ -४४ , ल्युक ३ :१७ , II थेस. १ :१ -९ , II पेट. २ :४ , ९ , रेव्ह. १४ :१० -११ **४४** इसा. ६४ :४ , I कॉर २ :९ , रेव्ह. ७ :१६ -१७ , २१ :३ -४ , २२ -२७ , २२ :१ -५ **४५** पीएसए. १०३ :१५ -१८ , जॉन १२ :२५ , जास. १:९ -१२ , I जॉन २ :१५ -१७ 46 डॅन. ७ :७ -११ , २३ -२६ , रेव्ह. १४ :८ , १६ :१० -११ , १७ :१५ -१८ , चॅं. १८ ,१९ :२० **४७** मॅथ्यू. २६ :२८ , ॲक्ट्स् १३ :३८ -३९ , हिब्रू. ९ :२२ , २६ , I जॉन १ :७ **४८** रोम. १० :१४

जर तुम्हाला तुमचा बचाव व्हावा असे वाटत असेल तर कृपया ही प्रार्थना म्हणा आणि तुमचा बचाव होईल:

**"हे प्रभू आणि हे ईश्वरा, माझ्या आत्म्यावर, एका पाप्यावर दया कर.[४९] माझा विश्वास आहे की येशू ख्रिस्त हा जिवंत ईश्वराचा पुत्र आहे.[५०] माझा विश्वास आहे की त्याने माझी आधीची सर्व पापे माफ व्हावीत यासाठी तो सुळावर मृत्यू पावला आणि स्वत:चे मौल्यवान रक्त सांडले.[५१] माझा विश्वास आहे कि ईश्वराने पवित्र आत्म्याच्या शक्तीद्वारे येशूला मृतावस्थेतून उठवले आहे,[५२] आणि ईश्वराच्या उजव्या बाजूला बसून तो या क्षणाला माझ्या पापांचा कबुलीजबाब आणि ही प्रार्थना ऐकत आहे.[५३] हे येशू ख्रिस्ता, मी माझ्या हृदयाचे दार उघडून तुला माझ्या हृदयात येण्याचे आमंत्रन देत आहे.[५४] तु माझ्याऐवजी कॅवलरी येथे क्रुसावर जे रक्त सांडलेस त्या मौल्यवान रक्ताने माझी सर्व घाणेरडी पापे धुवून काढ.[५५] हे येशू ख्रिस्ता, तू मला दूर करणार नाहीस आणि माझ्या सर्व पापांना माफ करून माझ्या आत्म्याला वाचवशील. हे मला माहीत आहे कारण तुझा शब्द म्हणजेच बायबल तसे सांगते.[५६] तुझा शब्द सांगतो की तू कोणालाही दूर लोटणार नाहीस आणि त्यामधे माझाही समावेश होतो.[५७] म्हणूनच मला माहित आहे की तू माझी प्रार्थना ऐकली आहेस मला माहित आहे की तू माझ्या हाकेला उत्तर दिले आहे आणि मला माहित आहे की तू मला वाचवले आहेस.[५८] हे येशू ख्रिस्ता, माझा आत्मा वाचवल्याबद्दल मी तुझे आभार मानतो आणि तुझी आज्ञा मानून आणि यापुढे कोणतेही आणखी पाप न करून माझी कृतज्ञता व्यक्त करतो.[५९]**

येशु म्हणतो की, मुक्ती मिळाल्यानंतर, पिता पुत्र व पवित्र आत्म्याच्या नावाने पाण्यात पूर्णपणे बुडवून, आपण बाप्तिस्मा घ्यावयाचा आहे.[६०] बायबल सोसायटी ऑफ इंडिया, बंगलोर द्वारे प्रकाशित बायबल मराठी आवृत्ती सखोलपणे वाचा नीट आणि ते जे सांगते ते करा.[६१]

प्रभु सांगतो की तुम्ही इतरांना तुमच्या मुक्तीबद्दल सांगावे. आपण पॅस्टर टोनी अलामोच्या गॉस्पेल साहित्याचे वितरक होऊ शकता. आम्ही आपणस हे साहित्य मोफत देवु. अधिक माहितीसाठी आम्हाला कॉल करा किंवा ई-मेल करा. हा संदेश इतरांपर्यंत पोहचवा

जर तुम्हाला येशूच्या आदेशानुसार, हे जग वाचले जावे असे आपल्याला वाटत असेल तर ईश्वराला टायथिस आणि प्रसादापासून वंचित ठेवू नका. ईश्वराने म्हटले, मणुष्य देवाला ठकवील काय? तुम्ही तर मला ठकविले आहे; असे म्हणून तुम्ही म्हणता आम्ही कोणत्या बाबतीत तुला ठकविले आहे? दशमांश (टायथिस) आणि अर्पणे यासंबंधाने. तुम्ही एका शापाने शापित झाला आहात: कारण तुम्ही आणि या पूर्ण राष्ट्राने आणि [संपूर्ण जगाने] मला लुटले आहे.सेनाधीश परमेश्वेर म्हणतो, माझ्या मंदिरात अन्न असावे म्हणून सगळा दशमांश (टायथिस-तुमच्या एकूण उत्पन्नाचा दहावा हिस्सा) तुम्ही भांडारात आणा म्हणजे मी आकाशकपाटे उघडून जागा पुरणार नाही एवढा आशीर्वाद तुम्हाकरिता वर्षितो की नाही याविषयी माझी प्रतीती पाहा. तुमच्या भूमीच्या पिकाची नासाडी होऊ नये म्हणून ते खाऊन टाकणाऱ्यास मी तुम्हासाठी धमकावीन; तुमच्या बागेतील द्राक्षलतांचे फळ अकाली गळणार नाही असे सेनाधीश ईश्वर म्हणतो." (मलाखी३ :८ -१२ ).

यजमानांचा ईश्वर असेही म्हणतो, "मी तुमच्या भल्यासाठी भक्षकाला फटके देईन म्हणजे तो तुमच्या जमिनीवरील फळांचा नाश करणार नाही आणि तुमच्या वेलीवर वेळेच्या आधी फळे लागू देणार नाही आणि सर्व देश तुम्हाला नशीबवान समजतील कारण तुमची जमीनीवर समृध्दी असेल." (मलाखी३ :८ -१२ ).

## पोपबाबतची आणखी काही गुपिते खाली दिली आहेत

व्हॅटिकन इतके गूढ आहे की बऱ्याचश्या धर्मगुरूंना, नन आणि त्यांच्या पाद्रीच्या कनिष्ठ पातळीवरचे सदस्य, केंद्र सरकारच्या कनिष्ठ स्तरांवर काम करणाऱ्या सदस्यांना, हे सुध्दा माहित नसते की ते जगातल्या सर्वात मोठया सैतानी चर्चचा एक हिस्सा आहेत आणि अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, अश्लील साहित्य, दारू आणि काळा बाजार या आणि प्रत्येक घाणेरडी कृत्याचे मूळ व्हॅटिकन व तिच्या सरकारी एजंसीमध्ये आढळू शकते. 62या मोठया गटाला, रोमन कॅथलिक सैतानी चर्चला सोडणारे म्हणतात, व्हॅटिकनचे ६८% पाद्रींना समलिंगी संबंध, लेस्बियन संबंध आणि व्यभिचार इ.साठी दोषी ठरवले जाऊ शकेल. या सर्व कृत्यांना ईश्वराने पूर्णत: मनाई केली आहे आणि जर त्या सर्वांना या कृत्यांबाबत पश्चाताप झाला नाही ते नरकात जातील.[६३] फार पूर्वीपासून अनेक नामवंत लोकांनी व्हॅटिकनला "भ्रष्टाचाराचे गटार" असे नाव दिले आहे."

व्हॅटिकनमध्ये बरीच वर्षे काम केलेल्या, या धार्मिक गटाच्या एका उच्च स्तरीय जेज्युईट पाद्रीने, जो फक्त पोपला उत्तरे देण्यास जबाबदार होता, मला सांगीतले की जेव्हा आजचा पोप जॉन पॉल II, हा क्राकाव, पोलंड येथे धर्मगुरू म्हणून काम करत होता तेव्हा कारखान्यातील बऱ्याचशा कामगारांच्या मनांत त्याच्या विषयी (जॉन पॉल II) विषयी राग निर्माण झाला होता व बऱ्याचशा कामगारांना असे वाटत होते की त्याला मारून टाकावे आणि त्याने जवळपासही फिरकू नये आणि तो त्यांच्या जवळपास आलेला दिसला तर आम्ही त्याच्यावर तेलकट चिंध्या फेकून मारत असु असे ते कामगार म्हणत, कारण त्यांना असे समजले होते की तो पोप बनण्यापूर्वी लहान मुलांचे लैंगिक शोषण करत होता. त्या कामगारांनी असेही सांगीतले की तो (आताचा जॉन पॉल II )समलिंगी आहे यावरूनच नव्या व्हॅटिकन केंद्र सरकारचे नियम व कायदे समलिंगी संबंधाबाबत भेदभाव न करणारे आहेत असे दिसून येते.

पोप जॉन पॉल II यांनी धर्मगुरू असताना प्रेम (वासना) यावर एक पुस्तक लिहिले ज्यामध्ये सिगमंड फ्रॉईड या ज्यू धर्मीय व्यक्तीच्या उद्गारांचा पुन्हा पुन्हा उल्लेख केलेला आढळला जणू काही ते एक पवित्र लेखन होते. सिगमंड फ्रॉईड हा ज्यू धर्मीय माणसाने, रोमन कॅथलिक धर्म स्वीकारलेला होता. एक अत्यंत कामविकृत व्यक्ती म्हणून सर्व जगाला तो माहित आहे. "पाप" व "अपराधीपणा"सारखे हे शब्द दूर करण्यासाठी सैतानाने, व्हॅटिकनचे एक-जगतीय सरकार, चर्च व माध्यमे यांच्या मदतीने तसेच, संपूर्ण मानसशास्त्रीय क्षेत्राने त्याला मोठे केले. व्हॅटिकनने आज आणि भूतकाळात देखील ईश्वराच्या मणुष्यासोबतच्या दैवी व्यवहारावरील श्रद्धा स्वीकारणाऱ्या लोकांना वेड्यांच्या संस्थांमध्ये टाकण्यासाठी या मानसशास्त्रज्ञ व मानसोपचार तज्ञांचा उपयोग केला. जो ईश्वराच्या वचनांद्वारे या पंथाचे- ज्याला ईश्वराने रिविलेशनमध्ये वेश्या म्हटले आहे- पितळ उघडे पाडतो, आणि जो ईश्वराच्या प्रत्येक वनचाचे पालन करतो, ज्यामधे, मृत व्यक्तीला जीवित करणे, आजारी व्यक्तींना बरे करणे, सैतानांचा धिक्कार करणे, पुनर्जन्म घेणे, सैतानाला (रिव्हिलेशनमधील वेश्या) प्रतिकार करून उघडे पाडणे या येशूच्या आज्ञांचा समावेश होतो, त्या सर्वांची खिल्ली उडवण्याचे काम मानसशास्त्रज्ञ व मानसोपचार तज्ञ आणि व्हॅटिकनची भारीभक्कम प्रसार माध्यमे सतत करत असतात. जॉन पॉल II व फ्रॉईडमधे सारखाच विकृतपणा भरलेला होता, असे त्याने स्वतःच त्याच्या पुस्तकांत म्हटले आहे.

आता त्याचा पूर्ण उत्कर्ष झाल्यामुळे (रोमन कॅथलिक सैतानी चर्चचा आणि केंद्रीय सरकारी संस्थांचा शासक म्हणून) तो आता त्याला वाटेल तसे कायदे बनवू शकतो. आणि त्याच्या स्वप्नातील कल्पना आपण पूर्ण कराव्यात यासाठीचे असे कायदे बनवतो, ज्याद्वारे युवक युवतींना कॉलेजच्या वसतिगृहांत सामाईक स्वच्छतागृहे वापरावी लागतील. जेव्हा मनुष्यजातीवर, कायद्याद्वारे त्याच्या विचारधारांपणे वागण्याची सक्ती केली जाते तेव्हा त्याच्या विकृत मनाला आनंद होतो. विकृती आणि मृत्यूसंबंधीचे हे नवीन रोमन कॅनन कायदे, गृह आणि शहरी विकास विभाग आणि शिक्षण विभाग या त्याच्या दोन केंद्रीय सरकारी संस्थांनी लागू केले आहेत.[६४] हे अगदी अधिकृतरित्या केले गेले आहे असे वाटते आणि व्हॅटिकनने धारण केलेल्या हिमगौरीच्या निष्पाप भोळ्या प्रतिमेप्रमाणेच त्याचे हे कृत्य सुध्दा लपून राहिले आहे.

ईश्वर आणि सैतान यांच्यामधील अध्यात्मिक लढाईमुळे आपण खूप आनंदी व उत्साही होतो कारण येशूने म्हटले आहे, "स्वर्गामध्ये तुमच्यासाठी एक भले मोठे बक्षिस आहे कारण त्यांनी तुमच्या आधीच्या प्रेषितांना खूप छळले होते". (मत्तय५ :१२ ) आपण जगातील मूलभूत व सर्वात शक्तिशाली ख्रिश्चन संस्था आहोत. (आणि आपल्याला त्याचा अत्यंत अभिमान आहे).

काही खोटया प्रकाशन संस्था, ज्या स्वत:बद्दल खोटी ग्वाही देतात आणि (काही संस्था तर फसवेगिरी करून बायबल सुध्दा छापतात) येशूची वचने पाळत नाहीत, येशूने म्हटले होते, "कुठल्याही मनुष्याबरोबर हिंसेने वागू नका आणि त्यावर खोटे दोषारोप करू नका" (ल्युक३ :१४ )त्यांनी

**४९** पीएसए. ५१ :५ , रोम. ३ :१० -१२ , २३ **५०** मॅथ्यू. २६ :६३ -६४ , २७ :५४ , ल्युक १ :३० -३३ , जॉन ९ :३५ -३७ , रोम. १ :३ -४ **५१** ॲक्ट्स ४ :१२ , २० :२८ , रोम. ३ :२५ , १ जॉन १ :७ , रेव्ह ५ :९ **५२** पीएसए. १६ :९ -१० , मॅथ्यू २८ :५ -७ , मार्क १६ :९ , १२ , १४ , जॉन २ :१९ , २१ , १० :१७ -१८ , ११ :२५ , ॲक्ट्स २ :२४ , ३ :१५ , रोम. ८ :११ , १ कॉर १५ :३ -७ **५३** ल्युक २२ :६९ , ॲक्ट्स २ :२५ -३६ , हिब्रू. १० :१२ -१३ **५४** १ कॉर ३ :१६ , रेव्ह. ३ :२० **५५** इफ. २ :१३ -२२ , हिब्रू. ९ :२२ , १३ :१२ , २० -२१ , १ जॉन १ :७ , रेव्ह. १ :५ , ७ :१४ **५६** मॅथ्यू. २६ :२८ , ॲटक्ट्स् २ :२१ , ४ :१२ , एफ. १ :७ , कॉल. १ :१४ **५७** मॅथ्यू. २१ :२२ , जॉन ६ :३५ , ३७ -४० , रोम. १० :१३ **५८** हिब्रू. ११ :६ **५९** जॉन ५ :१४ , ८ :११ , रोम. ६ :४ , १ कॉर. १५ :१० , रेव्ह. ७ :१४ , २२ :१४ **६०** मॅथ्यू. २८ :१८ -२० , जॉन ३ :५ , ॲवक्ट्स् २ :३८ , १९ :३ -५ **६१** ड्यूट. ४ :२९ , १३ :४ , २६ :१६ , जॉश १ :८ , २२ :५ , २ टिम. २ :१५ , ३ :१४ -१७ , जास. १ :२२ -२५ , रेव्ह. ३ :१८ **६२** रेव्ह. १७ :१ -६ , १८ :२ -३ , २३ -२४ **६३** मॅथ्यू. १५ :१८ -२० , रोम. १ :२० -३२ , I कॉर ६ : ९ -१० , १८ , १० :८ , एफ. ५ :५ , हिब्रू. १२ :१६ -१७ , १३ :४ , रेव्ह. २१ :८ **६४** व्हॅटिकन युएसए, निनो लोबेलो, पृ. ७८ -७९

पंथांबाबतच्या त्यांच्या पुस्तकांमध्ये आपला समावेश केला आहे. त्यांनी उघडपणे केलेल्या खोटारडेपणामुळे आणि ईश्वराच्या सच्च्या कार्याला पुष्टी देण्यासाठी आम्हाला या अभद्र प्रकाशन संस्थांची तपासणी करावी लागली आणि तेव्हा आम्हाला असे आढळून आले की त्या संस्था जेज्युईट व्हॅटिकन पंथाकडून चालवल्या जात होत्या.

**तुम्ही माझ्या लोकांना चिरडिता, दीनांचे तोंड ठेचिता, हे काय? (यशया३ :१५ ). तुम्हाला हे माहित आहे ना की "आपण जे व जसे काही पेरतो तसे फळ आपल्याला मिळते." (गलतीकरांस ६ :७ )?**

**आणि तुमच्या दुसऱ्यांबरोबरच्या वाईट/चांगल्या वागणुकीची फळे परमेश्वराकडून कितीतरी पटीने जास्त प्रमाणांत आपल्याला शिक्षा किंवा बक्षीस स्वरूपांत मिळतात. "सूड घेणे हे माझे काम आहे, मी परतफेड करेन," ईश्वराने म्हटले आहे, "मी भरपाई करेन." (रोमकरांस १२ :१९ , इब्री लोकांस १० :३० ).**

आपण आनंदी आहोत कारण त्यांनी आपल्याबद्दल जे काही खोटेनाटे सांगीतले आहे त्याबद्दल आपल्याला भरपाई म्हणून ईश्वराकडून मोठे बक्षिस मिळणार आहे. (येशूने असे म्हटले आहे). (मत्तय५ :११ -१२ ).

व्हॅटिकनच्या केंद्र सरकारच्या एजन्सी व भारीभक्कम प्रसार माध्यमांनी (संगनमताने) सुध्दा स्वर्गामध्ये आपल्यासाठी भरपूर आनंद व बक्षिसे देण्याची तरतूद केली आहे कारण त्यांनी त्यांच्याबरोबर आपल्यालाही, खोटया आरोपांखाली न्यायालयांत खेचले आणि गेले पंधरा वर्षे सतत आमच्या विरूध्द बदनामी करण्याची मोहिम सुरू ठेवली.[६५] तपास करताना आम्हाला असे आढळले की ही भारीभक्कम प्रसार माध्यमे[६६] व अर्थातच सर्व सरकारी संस्था, ज्यांचा उल्लेख पूर्वी करण्यात आला आहे, गुप्तपणे व्हॅटिकनच्या मालकीच्या आहेत व त्यांचेद्वारा नियंत्रित आहेत. हे येशू ख्रिस्ता, आम्ही तुझे आभार मानतो आणि तुझी प्रशंसा करतो कारण सत्य काय आहे हे तू आम्हाला दाखवून दिले आहेस. आणि काही विशिष्ट बक्षिसे देण्याची हमी दिलीस. सालमिस्ट डेव्हिड यांनी लिहिल्याप्रमाणे:

**"या पृथ्वीचे राजे आणि राज्यकर्ते, ईश्वराच्या व त्याच्यावर प्रेमाचा अभिषेक करणाऱ्यांच्या विरोधात खलबते करतात आणि म्हणतात, चला त्या दोघांचे बंध तोडून टाकूया, आणि आपल्याशी जुळलेली त्यांची नाळ कापून त्यांना आपल्यापासून दूर करूया. स्वर्गामध्ये बसलेला तो [ईश्वर] हसेल: आणि त्यांची थट्टा करेल. आणि मग तो त्यांच्यावर कोपेल आणि मग आपली नाराजी व्यक्त करून त्यांना मनस्ताप देईल." (स्तोत्रसंहिता२ :२-५ ).**

### ईश्वराविरूध्द भांडणाऱ्यांना मिळणारे भयानक फळ

ईश्वर,त्याचा पुत्र येशू ख्रिस्त, पवित्र आत्मा आणि ईश्वराचे पवित्र लोक या सर्वांविरूध्द भांडणाऱ्या सर्वांचा तुमच्या प्रार्थनेत समावेश करा कारण ते जर ईश्वराशी सतत भांडत राहिले तर ईश्वराकडून त्यांना मिळणारे बक्षिसरुपी फळ फार भयानक असेल. आम्हाला, आमच्या स्वर्गातील वडिलांप्रमाणे व त्याचा पुत्र येशू ख्रिस्ताप्रमाणे, असे वाटत नाही की कोणालाही नरकात जावे लागावे. म्हणूनच आम्ही सर्व लोकांना येशू ख्रिस्ताच्या नावाने प्रार्थना करायला सांगतो जेणेकरून येशू ख्रिस्तामध्ये त्यांना त्यांचा उध्दारकर्ता मिळेल. आम्ही त्यांना अधर्मी निष्फळ कामे करण्याऐवजी (ज्याचा परिणाम म्हणून तुम्ही कायम नरकयातना व नरकवास भोगता) येशू ख्रिस्तासाठी काही चांगले करायला सांगतो. (आमची प्रार्थना सैतानासाठी किंवा ज्यांनी पवित्र आत्म्याची निंदानालस्ती केली आहे त्यांच्यासाठी नसते, त्यांच्यासाठी आम्ही प्रार्थना करत नाही [I योहान५ :१६ ]). येशु ख्रिस्ताने भाकीत केल्याप्रमाणे छळादरम्यान आमच्या चर्चचा विस्तार झाला आहे आणि ते सामर्थ्यशाली बनले आहे. जर ईश्वराने जगावर इतके प्रेम केले तर आपण का करू नये? हे लेखन प्रेमाने लिहिलेले आहे जेणेकरून इथून पुढे मौल्यवान आत्मे व्हॅटिकन व त्यांच्या सहयोग्यांद्वारे फसवले जाणार नाहीत व त्यांना रानटी पशूची खूण स्विकारावी लागणार नाही आणि नरकात ही जावे लागणार नाही.[६७]

ज्या प्रत्येकाने या पंथाबाबतचे (रोमन कॅथलिक सैतानी चर्च) व त्याच्या सहकाऱ्यांबाबतचे सत्य उघडकीस आणले त्या सर्वांना ऐतिहासिक काळापासून ते आजपर्यंत, पाखंडी, दुष्ट, धोकेबाज, गुढ आणि धर्मांध इ.नावे ठेवली गेली आहेत आणि त्यांच्या, मोठया प्रमाणावरच्या चारित्र्य हनन मोहिमेला बळी पडले आहेत.

ते असेही म्हणतात की आम्हाला व्हॅटिकन संशयाचा मानसिक रोग जडला आहे. पण अब्राहम लिंकन किंवा जॉन एफ. केनेडी यांनाही हा व्हॅटिकन संशयाचा मानसिक रोग जडला होता का? आणि आजचे लाखो लोक ज्यांना व्हॅटिकन केंद्र व राज्य शासनाकडून छळले जाते आणि त्रास दिला जातो आणि नोकऱ्या नसल्यामुळे ज्यांना उपाशी रहावे लागते नोकऱ्या नाहीत (काहीजण तुरूंगामध्ये बसले आहेत कारण पोटाची भूक शमवण्यासाठी त्यांना बळजबरीने चोरी करावी लागली होती), त्या सर्वांनाही व्हॅटिकन संशयाचा हा मानसिक रोग जडला आहे का?

हे सत्य उघडकीस आणल्यामुळे रोमन कॅथलिक पंथ असे भासवेल की त्यांना (सर्व लोकांमध्ये केवळ त्यांना) वाईट वागणूक मिळत आहे आणि भोळेपणाने विचारेल, "आमच्याबरोबर हे असे का घडत आहे?" कारण त्यांना माहित आहे की ज्यांना त्यांच्या कुटील कारस्थानांबद्दल काहीच माहिती नाही अशा लोकांना त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटेल (मला मात्र त्या सैतानाबद्दल अजिबात सहानुभूती वाटत नाही.) ईश्वराचा शब्द (बायबल) मी लिहिला नाही, मी फक्त त्याबद्दल प्रवचने देतो. ईश्वर चांगल्याचा करत नाही फक्त वाईटाचा तिरस्कार करतो.[६८]

व्हॅटिकन आणि तिचे लोक, निष्पापपणा व भक्तिभाव दाखवण्याचा सर्वोत्तम अभिनय केल्याबद्दल तसेच उत्तम मेक-अप करून आणि कपडेपट सजवून, बाहेरच्या जगांत हिमगौरीसारखे निष्पाप भोळे रूप धारण केल्याबद्दल ऑस्करच्या अॅकेडमी अॅवॉर्डचे मानकरी व्हायला हवेत. मात्र हिमगौरीच्या वेषाखाली, वाहणाऱ्या सडलेल्या जखमा आहेत ज्यामध्ये किडे वळवळत आहेत. मात्र वरकरणी हसत ती एकीकडे म्हणते, "बंधूनो, माझे तुमच्यावर प्रेम आहे, पण दुसरीकडे तिच्याच शहीदांच्या रक्ताने माखलेले हात ती आपल्या पाठीमागे लपवते.[६९]

व्हॅटिकन नेहमी स्वत:चा बचाव कसा करत आली आहे याचे एक उदाहरण इथे देत आहे. दुसरेमहायुद्ध (विरूध्द धर्मियांना नष्ट करण्याचा व्हॅटिकनचा एक प्रयत्न) पराजित होताना जेव्हा तिने पाहिले तेव्हा तिने, सहा दशलक्ष ज्यू लोकांचा वध करून झाल्यावर, त्वरेने एक हजार ज्यू लोकांना सुरक्षितपणे लपवून ठेवले आणि मग म्हटले की, "आम्ही ज्यू लोकांना संरक्षण दिले आम्ही ज्यू लोकांवर प्रेम करतो." व्हॅटिकनने प्रत्यक्षांत काय केले होते याबाबतचे हे सत्य आहे.

अॅकेडमी अॅवॉर्डसबद्दल बोलायचे झाले तर, व्हॅटिकन बऱ्याच काळापासून सिनेमा उद्योगांत कार्यरत आहे.[७०] हॉलिवूडवर तर रोमन कॅथलिक आघाडीचे खूप वर्चस्व आहे आणि "द सॉंग ऑफ बर्नाडे", "गोईंग माय वे" आणि इतर अनेक सिनेमे सादर करून त्यांनी रोमन कॅथलिक सैतानी चर्चची स्तुती केली आहे. शिवाय "एल्मर गॅंट्री" सारख्या सिनेमाला त्यांनी पुढे नेले ज्यामध्ये कुटिल प्रोटेस्टंट धर्मोपदेशकांना दाखवले आहे. तुम्हाला टी.व्ही. वरील "ड्रॅगनेट" ही मालिका आठवते का? ज्यामध्ये नेहमी हातात बायबल घेतलेला, चेहऱ्यावर हास्य असलेला आणि पोटमाळयावर आजीचा गळा दाबणारा ख्रिश्चन दाखवला आहे.[७१] आणि धर्मगुरूंची पात्रे नेहमीच सन्मानित, भरघोस मानधन घेणाऱ्या क्रॉसबी आणि बॅरी फिट्झजेराल्ड यासारख्या नटांनी वठवली आहेत. व्हॅटिकनने आमच्यावर मानसिकरित्या बऱ्याच प्रकारे वाईट परिणाम केला आहे. (वन वर्ल्ड चर्चचे नेते आणि जगातील सर्व सरकारांनी).

हिमगौरीप्रमाणे स्वत:ला भोळी आणि निरपराध असल्याचे भासवून, व्हॅटिकन स्वत:च्या, मातीच्या ईश्वरी रूपाला म्हणजे सैतानी चर्चच्या ईश्वराला (पंथाचा नेता पोप), सोनेरी मुलामा चढवून व प्रसार माध्यमांचा वापर करून, तीन तास सीबीएस वर प्रचार करत आहे. मला माहित आहे की तो तेलकट चिंध्या फेकून देण्याचा प्रसंग नक्कीच लेखनातून वगळला असेल.

रोमन कॅथलिक पंथामध्ये अनेक सुंदर लोक आहेत, जे श्रीमंत नाहीत किंवा अगदी गरीब आहेत आणि जे उच्च पदाची मागणी करत नाहीत. खूप जण तर अतिशय विनम्र आहेत. हे सर्वसामान्य लोक, रोमन कॅथलिक पंथाने-जी चर्च आहे असे त्यांना सांगण्यात आले आहे - केलेल्या व तो करत असलेल्या दुष्टपणाबाबत पूर्णत: अज्ञानी आहेत. परंतु ईश्वराला त्यांच्या अंत:करणाची माहिती आहे (तो आपल्या हृदयाचा ईश्वर आहे) तो या अज्ञानी लोकांना म्हणतो, **"माझ्या माणसांनो, तिच्यातून बाहेर पडा"**

---

**६५** व्हॅटिकन इंपिरिअॅरलिजम इन द ट्वेंटियथ सेंच्युरी, अॅ व्हरो मॅनहॅटन, पृ. १५५ **६६** द डॉक्युमेंट्स् ऑफ व्हॅटिकन II, वॉल्टर एम. अॅबबट, एस. जे. पृ३ १९ -३३१ ; व्हॅटिकन इंपिरिअॅनलिजम इन द ट्वेंटियथ सेंच्युरी, अॅलव्हरो मॅनहॅटन, पृ. १५० ; द रॉकफेलर फाईल, गॅरी अॅबलन, चॅ. ६ ; नन देअर कॉल ईट कॉन्स्पिरसी, गॅरी अॅपलन, चॅ. 5; कोलिएर्स् नॅशनल एनसायक्लोपिडिया, १९३६ , एस. वी. "इल्युमिनाटी", कॅथलिक एनसायक्लोपिडिया, , एस. वी. "इल्युमिनाटी", "इंगोलस्टॅड" **६७** रेव्ह. १३ :१६ -१८ , १४ :९ -११ , १९ :२० **६८** पीएसए. ७ :११ , ४५ :६ -७ , प्रोव्ह. ८ :१३ , अॅरमॉस ५ :१५ , रोम. १ :१८ , हिब्रू. १ :८ -९ **६९** रेव्ह. १७ :१ -६ , चॅ. १८ **७०** व्हॅटिकन युएसए, निनो लोबेलो, पृ. २० -२१ **७१** स्मोकस्क्रीन्स्, जॅक चिक, पृ. ४६

**(प्रकटीकरण१८ :४ ).** म्हणून आपण अशी प्रार्थना करूया की ते लवकरच व्हॅटिकनमधून बाहेर पडतील.

रोमन वेश्यागृह चालवणाऱ्या सैतानी वृत्तीच्या सुपर–बॉसला (पोपला) आणि त्यांना ताकदवान बनवणाऱ्या सर्व सरकारांना गंभीरपणे एक आठवण करून द्यायची आहे की तुमची राजवट फार काळ टिकू शकणार नाही, असे ईश्वरानेच सांगीतले आहे.

> **"आणि एका घटकेत ह्या इतक्या संपत्तीची राख झाली."(प्रकटीकरण१८ :१७ ).**
>
> **"तिचा धुर युगानुयुग वर चढत आहे." (प्रकटीकरण१९ :३ ).**
>
> **"तेव्हा मी तीन अशुद्ध आत्मे जे बेडकासारखे दिसत होते ते पाहिले. ते प्रचंड सापाच्या मुखातून बाहेरआले. श्वापदाच्या मुखातून बाहेर आले, खोट्या संदेष्ट्याच्या मुखातून बाहेर आले. " (प्रकटीकरण१६ :१३ ).**

ज्यू धर्मगुरूपदाचा अंत कलवारी येथे झाला.[७२] बायबलमध्ये कुठेही ईश्वराने, ज्यू वगळता, इटली, पोलंड किंवा इतर वंशाच्या लोकांना धर्मगुरूपदाचे अधिकार दिले नाहीत. आणि ज्यूंच्या बारा जमातींपैकी फत लेवी जमातीलाच ईश्वराने धर्मगुरूपद सांभाळायला सांगितले आहे.[७३] यावरून असे दिसून येते की व्हॅटिकन, हे बायबलवर आधारित नसलेले आणि काल्पनिक जगांत वावरणारे आहे. जेव्हा येशूने म्हटले होते की, "ते आता संपले आहे," तेव्हा फक्त येशूच महाधर्मगुरू बनला. (योहान १९ :३० ).[७४]

व्हॅटिकनला रोम पासून जेरूसलेमकडे स्थलांतरित व्हायचे आहे.[२६] सप्टेंबर, १९७३ रोजी ह्यूस्टन क्रॉनिकलने माहिती दिली की राजकीय सत्तेची हाव असलेल्या हेनरी किसिंजर याने या पंथाला (व्हॅटिकनला) असा प्रस्ताव देऊन मदत केली की ज्यायोगे "जेरूसलेम एक आंतरराष्ट्रीय शहर बनेल व सर्व पवित्र स्थानांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी आणि धार्मिक प्रशासन पोपद्वारे सांभाळली जाईल".

बायबलमधे कुठेही पर्गेटरीचा (पापक्षालनाचे काल्पनिक ठिकाण) किंवा तश्याप्रकारच्या स्थळाचा उल्लेख नाही. परंतु बायबल स्पष्टपणे म्हणते की, **"आणि जसे लोकांना एकदाच मरण व नंतर न्यायासनासमोर येणे नेमून ठेवलेले असते," (इब्री लोकांस९ :२७ ).** आणि ईश्वराने म्हटले, तो एकतर स्वर्ग असेल नाहीतर नरक असेल, याव्यतिरिक्त काहीही नसेल.[७५] तुम्ही तुमचा स्वर्गात जाण्याचा मार्ग विकत घेऊ शकत नाही किंवा नरकांतून बाहेर येण्याचा मार्गही विकत घेऊ शकत नाही.

नव्या करारामध्ये कुठेही असे म्हटलेले नाही की, आपण ज्या प्रकारे विश्वास ठेवतो त्या प्रकारे इतर लोक विश्वास ठेवत नसतील तर त्यांना मारून टाकावे. परंतु व्हॅटिकन अशा हत्येला "पवित्र लढाई असे नाव देते आणि त्याचे समर्थन करते व असे करून सिध्द करते की ती पूर्णपणे सैतानी चर्च आहे जी बायबलचे अनुसरण करत नाही.

**पन्नास वर्षांपूर्वी मुख्य धर्मगुरू गिलरॉय यांनी म्हटले होते:**

> **"पोस्ट ऑफिसवरती आमच्या कॅथलिक लोकांचे नियंत्रण असल्यामुळे, पोस्टविभागाला, रोमन कॅथलिक नसलेल्या काही विशिष्ट [पाखंडी] लोकांच्या चळवळींबाबतचा आणि काही विशिष्ट परिस्थितींबाबतचा ठावठिकाणा माहित आहे. आणि अशी माणसे पोस्ट ऑफिसमध्ये आमच्या नियंत्रणाखाली, तुमच्या सेवेसाठी, असल्याने आमचे गुप्त पोलिस कायद्याचे गुन्हेगार म्हणून सापडले तरी आम्हाला घाबरायचे कारण रहाणार नाही."**

या सत्य माहितीवरून हे स्पष्टपणे लक्षांत येईल की, सध्या पोस्ट विभाग आमचा घाऊक दराचा दर्जा का काढून घेत आहे. व्हॅटिकन, जे दोन प्रकारचे स्वातंत्र्य गुपचुपपणे हिरावून घेण्याच्या प्रयत्नात आहे ते म्हणजे आमचे भाषण स्वातंत्र्य व धर्म स्वातंत्र्य.याबाबतची घटनेने दिलेल्या दोन स्वातंत्र्याबाबतची हमी व्हॅटिकन गुन्हेगारी पध्दतीने दाबून टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. प्रत्येक देशांतील राज्य व केंद्र सरकारी संस्था, त्यांच्या प्रसार माध्यमांतील बातम्या व न्यायव्यवस्था, रोमच्या सूचनांवरून नक्कीच असे म्हणतील की "पोपबाबतची गुपिते" हे "तिरस्करणीय" लेखन आहे आणि मी तुमचा शत्रू आहे असेही ते सांगतील. पण पॉलने बायबलमध्ये जे सांगितले आहे तेच मी सांगतो. म्हणूनच "मी खरे बोलत असल्याने तुमचा शत्रू आहे असे मानले जावे का?" (गलतीकरांस४ :१६ ).

जेणेकरून लोकांची सैतानी पोपच्या तिरस्करणीय, हुकुमशाही व क्रुर नेतृत्वापासून व जागतिक सत्तेपासून सुटका होईल, जेणेकरून ते रोमन कॅनन तत्वांऐवजी आमच्या पवित्र अमेरिकन राज्यघटनेचे अनुसरण करतील आणि जेणेकरून सर्व देशांच्या लोकांची पशुच्या खुणेपासून व नरकातील आगीपासून सुटका होईल – अशाप्रकारचे सत्य सांगणे याचा अर्थ द्वेष पसरवणे होतो काय? येशूने म्हटले की खरे बोलणे म्हणजे प्रेम करणे आणि येशूने आम्हाला आज्ञा केली आहे की आम्ही देशोदेशी फिरून सत्य काय आहे याची शिकवण द्यावी.[७६] **कारण येशूने म्हटले आहे,मग सत्य काय आहे हे तुम्हांला समजेल. आणि सत्य तुम्हांला मुक्त करील." (योहान ८ :३२ )**

तुम्ही एकतर माझ्यावर नाहीतर पोपवर विश्वास ठेवू शकता. मी तुम्हाला पोपबाबतची काही गुपिते उघडी करून सांगीतली आहेत. ईश्वराने म्हटले की पोपची संस्था, ९९ % घृणास्पद गोष्टींची नव्हे, तर पृथ्वीवरील प्रत्येक घृणास्पद गोष्टींची जनक आहे.[७७] बायबल सोसायटी ऑफ इंडिया, बंगलोर द्वारे प्रकाशित बायबल आवृत्ती वाचा म्हणजे मी खरे बोलत आहे की नाही हे तुम्हाला समजेल. ईश्वरावर विश्वास ठेवा. **"येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवा म्हणजे तुम्ही वाचू शकाल." (प्रेषितांची कृत्ये १६ :३१ ).**

---

७२ इसा. ५३ :७ , मार्क १५ :३७ -३९ , हिब्रू. २ :१४ -१८ , ३ :१ -४ , ४ :१४ -१६ , ५ :१ -६ , ७ :१९ -२८ **७३** एक्स. २८ :१ , ३० :३० **७४** हिब्रू. २ :१४ -१७ , ३ :१ , ४ :१४ -१५ , ५ :५ -१० , ७ :२६ -२८ , ९ :११ -२८ **७५** रोम. २ :५ -६ , ५ :१८ , १४ :१० -१२ , II कॉर. ५ :१० , हिब्रू. ९ :२७ , ज्युड ६ , १४ -१५ **७६** मार्क १६ :१५ , ल्युक ९ :६० -६२ , ॲमक्ट्स् १० :४२ , रोम. १० :१३ -१५ , I कॉर. १ :१७ -१८ , II टिम. ४ :२ **७७** रेव्ह. १७ :३ -१५ , १८ , १८ :२ -१३ , २३ -२४


*अधिक माहितीसाठी व इतर विषयांवरील साहित्यासाठी आमच्याशी संपर्क करा.*

**टोनी अलामो, जागतिक पॅस्टरपॅस्टर , टोनी अलामो ख्रिश्चन मिनीस्ट्रीज वर्ल्डवाईड, पोस्ट बॉक्स २९४८, हॉलिवूड, कॅ. ९००७८**

**प्रार्थना व माहितीकरिता २४तास उपलब्ध: (६६१) २५२ -५६८६ • फॅक्स (६६१) २५२ -४३६२**

**www.alamoministries.com • info@alamoministries.com**


*यू.एस.मधील ज्या व्यक्तीं, आपले तन, मन, हृदय, ताकद व आत्मा अर्पन ईश्वराची सेवा करतील, अशा व्यक्तींना जगभरातील, टोनी अलामो ख्रिश्चन मिनिस्ट्रिज, अशी जागा पुरवते की जिथे जगण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी मिळतील*

**न्यूयॉर्क शहरांत दर मंगळवारी रात्री ८ वा. व इतर ठिकाणी प्रत्येक रात्रीच्या सेवा देण्यात येतात. अधिक माहितीसाठी कृपया (९०८) ९३७ - ५७२३ या क्र.वर फोन करा. प्रत्येक सेवेनंतर जेवण दिले जाईल.**

ख्रिश्चन धर्मोपदेशक , श्री.अलामो यांनी लिहिलेले पुस्तक "*द मसीहा*" मागून घ्या. यामध्ये जुन्या करारामधील३३३ च्यावर गोष्टींतून ख्रिस्ताबाबतचा पुरावा दिला आहे.

*पॅस्टरपॅस्टर अलामो यांच्या लेखी साहित्याचे वाटप करून लोकांची आत्मोन्नती करणारे सेवक म्हणून काम करा.*

*आमचे सर्व लेखी साहित्य व ऐकण्याचे संदेश ,शिपिंग शुल्कासह, नि:शुल्क पाठवले जातात.*

*जर त्यासाठी कुणी तुमच्याकडून पैसे घेत असेल तर कृपया पुढील क्र. वर फोन करा. (६६१) २५२ -५६८६ कलेक्ट.*

**या लेखी साहित्याद्वारे मुक्तीसाठी खरा मार्ग कोणता हे दाखवले जाते. (ॲक्ट्स ४ :१२ ).**

**हे साहित्य फेकू नका. कृपया दुसऱ्या कोणाला तरी ते वाचायला द्या.**

**जे कोणी दुसऱ्या देशांमध्ये असतील त्यांनी कृपया हे साहित्य त्यांच्या देशांतील बोली भाषांमध्ये अनुवादित करावे.**

**जर आपण हे साहित्य पुन्हा प्रकाशित करणार असाल तर कृपया खालील कॉपीराईट व रजिस्ट्रेशनचा समावेश करा.**


© कॉपीराईट १९८३ , २००६ , २०१२ , २०१३ , २०१४ जागतिक धर्मोपदेशक टोनी अलामो यांचेकडून सर्व हक्क राखीव. ® रजिस्टर्ड १९८३ , २००६ , २०१२ , २०१३ , २०१४